गोपनीय
व्यवस्थापन परिषद

क्र.इति/२०२१—२०२२/९

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२१-२०२२ मधील ३० डिसेंबर, २०२१ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२१-२०२२ ची नववी सभा **गुरूवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता** आयेजित करण्यात आली. कोरोना विषाणूंच्या संक्रमणापासून बचाव करण्याकरिता खबरदारीचा उपाय म्हणून ही सभा आभासी पध्दतीने घेण्यात आली.

सदर बैठकीस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ४. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ५. | प्रा. अजय भामरे | सदस्य |
| ६. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ७. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ८. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ९. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १०. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| ११. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १२. | श्री. सुधीर पुराणिक (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १३. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १४. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **स्वागत :-**

सदस्य सचिवांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

➢ **अनुपस्थिती :-** श्री. दिपककुमार मुकादम व डॉ. सुभाष वाघमारे यांनी त्यांची अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

➢ **श्रध्दांजली :-**

**श्रीमती. माधवी गोगटे**

प्रसिध्द मराठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती. माधवी गोगटे यांचे अल्पशा आजाराने दिनांक २० नोव्हेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ५८ वर्षांच्या होत्या.

**श्री. चंद्रकांत जाधव**

कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघातील कॉग्रेसचे आमदार श्री.चंद्रकांत जाधव यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०२ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५९ वर्षांचे होते.

**श्री. विनोद दुआ**

ज्येष्ठ पत्रकार श्री. विनोद दुआ यांचे प्रदिर्घ आजाराने दिनांक ०४ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

**श्री. के. रोसय्या**

आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि तामिळनाडूचे माजी राज्यपाल श्री. के. रोसय्या यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०४ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते.

**श्री. अशोक गोडसे**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपतीचे ट्रस्टचे अध्यक्ष श्री. अशोक गोडसे यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०६ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६५ वर्षांचे होते.

**डॉ. सुरेश जाधव**

स्वाइन फ्लूसह करोनाप्रतिबंधक लसनिर्मितीत सिंहाचा वाटा उचलणारे 'सीरम इन्स्टिटयूट ऑफ इंडिया' चे माजी कार्यकारी संचालक आणि शास्त्रज्ञ डॉ. सुरेश जाधव यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०७ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षांचे होते.

**सीडीएस जनरल बिपीन रावत**

भारताचे प्रथम चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल बिपीन रावत यांचे हेलिकॉप्टर अपघातात दिनांक ०८ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६३ वर्षांचे होते. त्यांचासह प्रवास करणा-या पत्नी मधुलिका रावत आणि अन्य ११ अधिका-यांचे यात निधन झाले.

**श्री. के. जी. परांजपे**

राज्याचे माजी मुख्य सचिव श्री. के. जी. परांजपे यांचे वृध्दपकाळाने दिनांक १३ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९१ वर्षांचे होते.

**डॉ. भीमराव कुलकर्णी**

चार वेदांचा वैज्ञानिक अनुषंगाने मराठीत अनुवाद आणि ७० उपनिषदांचे मराठीत भाषांतर करणारे संस्कृतचे गाढे अभ्यासक, वेदमूर्ती डॉ. भीमराव कुलकर्णी यांचे वृध्दपकाळाने दिनांक १३ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९९ वर्षांचे होते.

**श्री. अविनाश मसूरकर**

नाटक, चित्रपट आणि मालिका या तीनही माध्यमांतून अभिनेते म्हणून आपली छाप उमटवलेले ज्येष्ठ अभिनेते श्री. अविनाश मसूरकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक १४ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते.

**न्यायाधीश श्री. जी. टी. नानावटी**

उच्च न्यायालयातील ज्येष्ठ निवृत्त न्यायाधीश श्री. जी. टी. नानावटी यांचे वृध्दपकाळाने दिनांक १८ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.

**कॉ. रतन बुधर**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कमिटी सदस्य महाराष्ट्र राज्य किसान सभेचे उपाध्यक्ष आणि ठाणे - पालघर जिल्हा किसान सभेचे अध्यक्ष कॉ. रतन बुधर यांचे प्रदिर्घ आजाराने दिनांक १९ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षांचे होते.

**श्री. चंद्रकांत जोशी**

ज्येष्ठ सिनेदिग्दर्शक, कला समीक्षक, चित्रकार आणि कलामहर्षी बाबुराव पेंटर फिल्म सोसायटीचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत जोशी यांचे अल्पशा आजाराने दिनांक २० डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते.

**डॉ. धनाजी गुरव**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी गुरव यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५८ वर्षांचे होते.

### अभिनेता मुश्ताक मर्चंट

ज्येष्ठ हिंदी चित्रपट अभिनेते मुश्ताक मर्चंट यांचे अल्पशा आजाराने दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

### श्री. महेंद्र प्रसाद

ज्येष्ठ संयुक्त जनता दलाचे राज्यसभेचे खासदार आणि उद्योजक श्री. महेंद्र प्रसाद यांचे दीर्घ आजाराने दिनांक २१ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते.

| अनुक्रमांक | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दि. २१ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दि. २१ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. डॉ. वैभव नरवडे यांची नजरचुकीने दाखविलेली उपस्थिती दुरूस्त करून त्यांची अनुपस्थिती दाखविण्यात आली. | |
| बाब क्र. २ | व्यवस्थापन परिषद दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ चा कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषद दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ च्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |
| बाब क्र. ३ | विद्या परिषदेच्या दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या आभासी सभेमध्ये अनुक्रमे बाब क्रमांक– 6.4B.Voc (N) - introducing Bachelor of Vacation Degree (Tourism & Hospitality/ Hospitality & Tourism Administration) course, 6.5(N)- Certificate course in Gardening & Nursery Managment, 6.6(N) - Certificate Course in Organic Farming, 6.7(N) Certificate Course in Cultivation of Spice Plants, 6.8(N) Post Graduate Diploma in Biodiversity Assessment & Conservation, 6.9(N)- 1) BMS (Hospitality Management & Sports Administration) 2) BMS (Hospitality Management & Sports Studies) 3) BMS (Sports Management) 4) B.Sc. (Artificial Intelligence & Sports Analytics) 5) B.Sc. (Data Science & Sports Studies) 7.1(N) Master of Business Administration [Innovation Enterpreneurship & Venture Development (MBA-IEV), 8.2(A) amendment of R.9231 relating to the Scheme of Examination for Diploma in Acting skill, 8.3(A) amendmend of R.9259 relating to the Scheme of Examination for Diploma in Bharatnatyam, 8.4(A) | AAMS |

| | | |
|---|---|---|
| | amendment of R.9261 (A) relating to the Scheme of Examination for for Certificate Course in Dance for Special Students अन्वये पारित केलेले ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | |
| ठराव | विद्या परिषदेच्या दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या आभासी सभेमध्ये अनुक्रमे बाब क्रमांक–6.4B.Voc (N) - introducing Bachelor of Vacation Degree (Tourism & Hospitality/ Hospitality & Tourism Administration) course, 6.5(N)- Certificate course in Gardening & Nursery Managment, 6.6(N) - Certificate Course in Organic Farming, 6.7(N) Certificate Course in Cultivation of Spice Plants, 6.8 (N) Post Graduate Diploma in Biodiversity Assessment & Conservation, 6.9(N)- 1) BMS (Hospitality Management & Sports Administration) 2) BMS (Hospitality Management & Sports Studies) 3) BMS (Sports Management) 4) B.Sc. (Artificial Intelligence & Sports Analytics) 5) B.Sc. (Data Science & Sports Studies) 7.1(N) Master of Business Administration [Innovation Enterpreneurship & Venture Development (MBA-IEV), 8.2(A) amendment of R.9231 relating to the Scheme of Examination for Diploma in Acting skill, 8.3(A) amendmend of R.9259 relating to the Scheme of Examination for Diploma in Bharatnatyam, 8.4(A) amendment of R.9261 (A) relating to the Scheme of Examination for for Certificate Course in Dance for Special Students अन्वये पारित केलेल्या ठरावांस मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ४ | Outstanding advances for 2013 to 2016 of various colleges. | F & A |
| ठराव | After a detailed discussion it was resolved that the last warning letter is to be issued to the colleges to settle the CAP Advance amount within 15 days otherwise a penalty of 18% per annum on unspent amount will be charged for the amount due to the University. Also it was resolved that those colleges who did not settle the CAP Advance amount in stipulated time, be given a fair chance to represent themselves before the committee which is constituted for the Affiliation fee matter. After their representation to the committee, if they found guilty, the strict action be taken against them as per Maharashtra Public Universities Act, 2016. Adv. Neel Helekar, Chairperson of the committee, was given the responsibility to find out the way regarding time period/duration to complete the task in such a way that there will not be any injustice to any college and see to it that the decision will be uniformly implimented, with due urgency. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ५ | Proposal received from the Director, Late Shri. Vishnu Waman Thakur Charitable Trust's VIVA Institute of Management & Research, VIVA Technical Campus, At. Post, Shrigaon, Virar (East), Dist. Palghar-401 305 requesting to issue "No Objection Certificate for Merging of VIVA Institute of Management & Research (Child Institute) to VIVA Institute of Applied Art (Parent Institute)" from the Academic Year 2021-22. | College Affiliation & Development Department |
| ठराव | It was resolved that the proposal received from the Director, Late Shri. Vishnu Waman Thakur Charitable Trust's VIVA Institute of Management & Research, VIVA Technical Campus, At. Post, Shrigaon, Virar (East), Dist. Palghar-401 305 to issue "No Objection Certificate for Merging of VIVA Institute of Management & Research (Child Institute) to VIVA Institute of Applied Art (Parent Institute)" from the Academic Year 2021-22 be accepted, subject to the submission and confirmation of 'No University dues' certificate. | |
| बाब क्र. ६ | संचालक, रूस्तम इरानी फाऊंडेशन, रूस्तमजी बिझनेस स्कुल, रूस्तम इरानी मार्ग, दहिसर (प.), मुंबई- ४०० ०६८ या महाविद्यालयाने एम. एम.एस. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षापासून बंद करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाचा स्थानिक चौकशी समितीचा अहवाल. | College Affiliation & Development Department |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, रूस्तम इरानी फाऊंडेशन, रूस्तमजी बिझनेस स्कुल, रूस्तम इरानी मार्ग, दहिसर (प.), मुंबई-४०० ०६८ या महाविद्यालयाने एम.एम.एस. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षापासून बंद करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालास खालील अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली.<br>'महाविद्यालयास जो अभ्यासक्रम बंद करावयाचा आहे त्यासाठी कार्यरत असलेल्या शिक्षकांची सर्व देणी देण्यात आलेली आहेत असे ५०० रूपयांच्या स्टॅम्पपेपरवर महाविद्यालयाने लिहून दयावे व तो प्राप्त झाल्यानंतरच मा. कुलसचिवांनी त्यांना विषय बंद करण्याबाबतचे पत्र दयावे.' | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ७ | अध्यक्ष, सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, प्लॉट नं. ४६, सेक्टर-५, खारघर, नवी मुंबई-४१० २१० या महाविद्यालयाने १) मास्टर इन कॉम्प्युटर इंजिनिअरिंग (पी.जी.) आणि १) मास्टर इन इलेक्टॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग (पी.जी.) या अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षापासून विषय बंद करण्यासाठीचा स्थानिक चौकशी समितीचा अहवाल. | College Affiliation & Development epartment |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, प्लॉट नं. ४६, सेक्टर-५, खारघर, नवी मुंबई-४१० २१० या महाविद्यालयाने १) मास्टर इन कॉम्प्युटर इंजिनिअरिंग (पी.जी.) आणि १) मास्टर इन इलेक्टॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग (पी.जी.) या अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षापासून बंद करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालास खालील अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली.<br><br>'महाविद्यालयास जे अभ्यासक्रम बंद करावयाचे आहेत त्यासाठी कार्यरत असलेल्या शिक्षकांची सर्व देणी देण्यात आलेली आहेत असे ५०० रूपयांच्या स्टॅम्पपेपरवर महाविद्यालयाने लिहून दयावे व तो प्राप्त झाल्यानंतरच मा. कुलसचिवांनी त्यांना विषय बंद करण्याबाबतचे पत्र दयावे.' | |
| बाब क्र. ८ | विद्यापीठाचे सेवानिवृत्त शिक्षक कर्मचारी प्रा. अभय पेठे यांच्याकडून ॲड. नील हेळेकर समिती मार्फत निर्धारीत करण्यात आलेले दंडनीय शुल्क रू.६९,३८,५७५/- आकारणे बाबत मार्गदर्शन/आदेश मिळणेबाबत. | विद्यानगरी प्रशासकीय विभाग |
| ठराव | सदर प्रस्तावाच्या चर्चेच्या सुरूवातीला ॲड. निल हेळेकर यांनी समिती अध्यक्ष या नात्याने विषयाची मांडणी सर्वांसमोर केली. त्यांनी असे निदर्शनास आणले की शासनाने वेळोवेळी या संदर्भात दंड आकारणीबाबत शासन निर्णय निर्गमित केले असून विद्यापीठाने ते मान्यही केले आहेत. | |

मात्र सदर बाबतची अंमलबजावणी करताना काही प्रशासकीय त्रुटी दिसून आल्या आहेत. निवृत्तीनंतर अथवा काही इतर कारणांनी सदनिकेमध्ये वास्तव्य करण्याची लेखी परवानगी यापैकी एकाकडेही नाही. मात्र त्यांना त्यासाठी दंड आकारणी बाबत प्रशासनाकडून वेळेत आणि लेखी सूचना दिल्या गेल्या नसल्याचे समितीस आढळून आले. यामुळे आज या सदनिकाधारकांना दंडाची मोठी रक्कम भरावी लागत आहे, ज्याबद्ल ते अनभिज्ञ होते. थोडक्यात दोन्ही बाजूंकडून काही त्रुटी राहीलेल्या दिसून येत आहेत म्हणून विद्यापीठाचे आर्थिक नुकसानही होऊ नये आणि सदनिकाधारकांना थोडा दिलासा मिळावा असा सुवर्णमध्य काढण्याबाबत व्यवस्थापन परिषद सभासदांनी निर्णय घ्यावा असे आवाहन ॲड. निल हेळेकर यांनी केले. त्यास प्रा.डॉ. अजय भामरे, प्रा.डॉ. महादाप्पा गोंडा यांनी दुजोरा दिला.

मात्र प्रा. जगताप सर, श्री. रविकांत सांगुर्डे, श्री. प्रदिप सावंत, डॉ. वैभव नरवडे यांनी अशी कोणतीही तडजोड करण्यास विरोध दर्शविला व नियमानुसार जी दंड आकारणी देय आहे ती या सर्व सदनिकाधारकांनी भरावी जेणेकरून योग्य तो संदेश सर्वांमध्ये जाईल असे मत व्यक्त केले.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते असे ठरविण्यात आले की, प्रा. अभय पेठे यांच्याबाबत समितीने दिलेला अहवाल व उर्वरित ९ जणांबाबत त्याच धर्तीवर करावयाची कारवाई यास मान्यता देण्यात आली. तसेच या अहवालानुसार जे सदनिकाधारक दंडाची रक्कम जमा करतील व सदनिका सोडतील त्यांना तात्काळ "No dues" प्रमाणपत्र देण्यात यावे.

तसेच मा. कुलगुरू यांनी मा. कुलसचिवांना निर्देश दिले की, विद्यापीठातील सदनिकाधारकांसाठी तात्काळ एक परिपत्रक निर्गमित करावे व त्यामध्ये सदनिकेत राहण्याबाबतच्या अटी व शर्ती, निवृत्तीनंतर किती दिवसांत सदनिका खाली करणे, तसे न केल्यास किती दंड आकारणी होईल, इत्यादी बाबतची सविस्तर माहिती दयावी आणि प्रत्येक सदनिकाधारकाबरोबर 'राहण्यासाठीचा परवाना' (Licence to stay) अशा

| | | |
|---|---|---|
| | रितीचा करार (agreement) तात्काळ करावा व सर्वांच्या सहया घ्याव्यात. कुलसचिव व उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, विद्यानगरी यांनी सदर कार्यवाही तात्काळ करावी. तसेच अजूनही कोणी शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यापीठाच्या सदनिकेमध्ये अवैध पध्दतीने रहात असेल तर त्याची तपासणी उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, विद्यानगरी यांनी त्वरीत करून सदर समितीस कळवावे. | |
| बाब क्र. ९ | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरातील प्रशासन विभागाकरीता दोन दुचाकी स्कुटर (Activa) देणगी स्वरूपात स्विकारणेबाबत. | विद्यानगरी प्रशासकीय विभाग |
| ठराव | सखोल चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की देणगीदार श्री. विनोद मालदे यांच्याशी चर्चा करून त्यांनी देऊ केलेल्या दोन दुचाकी स्कुटरऐवजी तेवढयाच रकमेमध्ये येतील तेवढया सायकली दिल्यास विद्यापीठास देखभालीच्या दृष्टीने सोयीचे होईल, असा प्रस्ताव त्यांच्यासमोर मांडावा व त्यास त्यांची अनुमती मिळवावी. सदर कामी Yulu Bike च्या प्रस्तावासाठी गठीत करण्यात आलेल्या ॲड.निल हेळेकर समितीने पुढाकार घेऊन श्री. विनोद मालदे यांच्याशी चर्चा करावी. | |
| बाब क्र. १० | देणगीदार डॉ. एस. ए. दवे यांनी मुंबई विद्यापीठाच्या, मुंबई स्कूल ऑफ इकोनॉमिक्स आणि पब्लिक पॉलिसी मधून एम. ए. या अभ्यासक्रमात प्रवेश घेणा-या व बी. ए. या पदवी अभ्यासक्रमात प्रथम CGPA/गुण संपादन करणा-या दोन विद्यार्थ्यांस/विद्यार्थीनीस सौ. सुधा दवे यांच्या नावे शिष्यवृत्ती देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव. | शिष्यवृत्ती विभाग |
| ठराव | सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, विद्यापीठाच्या मुंबई स्कूल ऑफ इकोनॉमिक्स आणि पब्लिक पॉलिसी विभागामध्ये प्रत्येक वर्षी एम. ए. या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी पदवी परिक्षेत सर्वोच्च गुण प्राप्त झालेल्या दोन विद्यार्थ्यी/विद्यार्थींनी यांना सौ. सुधा दवे यांच्या नावे शिष्यवृत्ती देण्यात यावी. तसेच सदर शिष्यवृत्तीची रक्कम देणेबाबत असे ठरले की, देणगीदार डॉ.एस. ए दवे यांनी दिलेले रू.१० लाख या संपूर्ण रकमेची गुंतवणूक करावी व त्यावर आलेल्या व्याजाच्या एकूण रकमेपैकी | |

| | | |
|---|---|---|
| | ७० टक्के रक्कम शिष्यवृत्तीसाठी वापरावी, २० टक्के रकमेची भविष्यातील तरतूदींसाठी गुंतवणूक करावी व १० टक्के रक्कम प्रशासकीय बाबींच्या खर्चासाठी वापरावी, जेणेकरून केवळ वर्तमानातच नव्हे तर भविष्यातही अनेक वर्षे विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती देणे शक्य होईल.<br>तसेच असेही ठरविण्यात आले की, अशा ज्या आधीपासून सुरू असलेल्या शिष्यवृत्ती/सुवर्णपदके आहेत आणि जिथे त्यांची रक्कम कमी झालेली आहे अशा सर्व शिष्यवृत्तींचा/पदकांचा आढावा घेऊन, आवश्यकता असल्यास देणगीदारांना विनंती करून त्या शिष्यवृत्ती सक्षमपणे पुन:श्च सुरू करणे जेणेकरून विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. याकामी विद्यापीठाने गठीत केलेल्या गुंतवणूक समितीलाच सदर शिष्यवृत्तींचा/सुवर्णपदकांचा आढावा घेण्याची जबाबदारी देण्यात आली. त्यांनी यापुढे सदर शिष्यवृत्ती/पदके सुरू राहण्याच्या दृष्टीने आवश्यक असा आराखडा, मार्गदर्शक तत्वे तयार करून विद्यापीठास सादर करावीत. | |
| बाब क्र. ११ | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्या (Board of National and International Linkage) दि. ४ डिसेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने विविध शैक्षणिक संस्थांचे मुंबई विद्यापीठाशी असलेल्या प्रस्तावित सामंजस्य करारांना (MoU) मान्यता देण्याबाबत. तसेच सामंजस्य करारांचे (MoU) मुल्यमापन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मुद्यांना (Points for Evaluation of MoU) मान्यता मिळण्याबाबत. | RAPC |
| ठराव | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्या (Board of National and International Linkage) दि. ४ डिसेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने विविध शैक्षणिक संस्थांचे मुंबई विद्यापीठाशी असलेल्या प्रस्तावित सामंजस्य करारांना (MoU) व सामंजस्य करारांचे (MoU) मुल्यमापन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मुद्यांना (Points for Evaluation of MoU) मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. १२ | Request to approve the MMS programme along with the fee structure, to be provided through Open and Distance Mode and Online mode in IDOL from the academic year 2021-22. | दुर व मुक्त अध्ययन संस्था |

<table>
<tr><td>ठराव</td><td>It was resolved to approve the fee structure of the MMS programme to be provided through Open and Distance Mode and Online mode in IDOL from the academic year 2021-22.</td><td></td></tr>
<tr><td>बाब क्र. १३</td><td>वित्त व लेखा समितीच्या दि. २८ डिसेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.</td><td>वित्त व लेखा विभाग</td></tr>
<tr><td>ठराव</td><td>वित्त व लेखा समितीच्या दि. २८ डिसेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तातील बाब क्र. १ व ६ या वगळता इतर बाबींना मान्यता देण्यात आली. बाब क्र. १ व ६ बाबतचे व्यवस्थापन परिषदेने पारीत केलेले ठराव खालीलप्रमाणे :-</td><td></td></tr>
<tr><td>बाब क्र. १</td><td>
<table>
<tr><td colspan="4">वार्षिक क्रिडा अंशदान (Annual Sports Contribution) जिमखाना शुल्क रू. ४००/-च्या १५% वरून २५% वाढ करण्याबाबतचा तक्ता.</td></tr>
<tr><td>अ. नु. क्र.</td><td>जिमखाना शुल्क रूपये (विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयात जमा) रूपये</td><td>सध्याचे शुल्क वार्षिक क्रीडा अंशदान जिमखाना शुल्काच्या १५% ना प्रति विद्यार्थी (महाविद्यालयाकडून विद्यापीठाकडे) रूपये</td><td>प्रस्तावित/ सुधारीत शुल्क वार्षिक क्रिडा अंशदान जिमखाना शुल्काच्या २५% प्रति विद्यार्थी (महाविद्यालयाकडून विद्यापीठाकडे) रूपये</td></tr>
<tr><td>१.</td><td>४००/-</td><td>६०/-</td><td>१००/-</td></tr>
</table>
वार्षिक क्रिडा अंशदान (Annual Sports Contribution), जिमखाना शुल्क रूपये ४००/- (Gymkhana Fees) च्या १५% (रू.६०/-) वरून २५% (रू.१००/-) वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव मा. वित्त व लेखा समितीच्या मान्यतेकरीता सादर.</td><td></td></tr>
<tr><td>वि. व ले. समिती ठराव</td><td>सदर प्रस्ताव (नोंद करून) व्यवस्थापन परिषदेच्या योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.</td><td></td></tr>
<tr><td>व्य.प. ठराव</td><td>वित्त व लेखा समितीच्या बैठकीतील वरील प्रस्तावावर व्यवस्थापन परिषदेच्या सभासदांनी विविध मते व्यक्त केली. मा. कुलगुरूंनी या प्रस्तावाची सविस्तर पार्श्वभूमी विषद केली की विद्यापीठाच्या क्रिडा विभागाच्या नवीन रचनेनुसार चार झोन करण्यात आले असून क्रिडाविषयक खर्चातही वाढ होणार आहे. मात्र सदरबाबत प्राचार्यांच्या बैठकीमध्ये समक्ष चर्चा केली जाईल व सदर भूमिका मांडली जाईल व तद्नंतरच या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेतला जाईल. यास्तव, महाविद्यालयांच्या रू.४००/- या क्रिडा शुल्काच्या १५% ऐवजी २५% रक्कम विद्यापीठास देण्याबाबतचा सदर प्रस्ताव पुढील एक वर्षासाठी स्थगित</td><td></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. पुढील वर्षी आढावा घेऊन तद्नंतर निर्णय घेण्यात यावा. तो पर्यंत परत एकदा सर्व महाविद्यालयांना कुलसचिवांच्या मार्फत महाविद्यालयांमध्ये 'क्रिडा संचालक' हे पद तात्काळ भरण्याबाबत कळविण्यात यावे. | |
| Item No.6 | To Consider University Contribution for the Repair and Renovation work of WRIC-ICSSR Guest House and Auditorium. | |
| F & A Resolution | Resolved that the University of Mumbai will not contribute towards the Repair & Renovation work of WRIC-ICSSR Guest House and Auditorium. | |
| M. C. Resolution | It was Resolved that the University of Mumbai is not in position to contribute towards the Repair & Renovation work of WRIC-ICSSR Guest house and Auditorium. ICSSR, New Delhi be communicated that the total expense for the Repair & Renovation is to be borne by them. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

17/1/22

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

इतिवृत्त मंजूर

कुलगुरू